SHRI ADINATHA CO-OP. BANK LTD. R.No. KPR/HLE/BNK (D) 113/96 Dt. 16.1.1996 ICHALKARANJI

श्री.आदिनाथ को ऑप बँक लि.इचलकंरजी
प्रधान कार्यालय
७/२३,२४,अडत पेठ,जनता चौक,इचलकंरजी.

# कर्ज धोरण *(Loan Policy)*
## २०२२ -२०२३

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचे कर्ज धोरण खालीलप्रमाणे राहील. आर्थिक वर्ष संपणेपुर्वी दोन महिनेचे आत सदर धोरणाचा पुर्नविचार (Review ) करून तसेच त्यामध्ये आवश्यकते नुसार योग्य ते बदल करून,रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया यांच्या परिपत्रकानुसार कर्ज धोरण ठरविणेत आले आहे.

कर्जे हे बँकेचे महत्वाचे मिळणारे व्याजाच्या उत्पन्नाचे साधन आहे.रिझर्व्ह बँकेने ठेवीवरील व कर्जावरील व्याजाचे निर्बंध उठवलेले आहेत.म्हणून स्पर्धा निर्माण झाल्यामुळे नफ्याला बँकिंग क्षेत्रामध्ये अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालेले आहे.नफा मिळविण्यासाठी व्याजाचे उत्पन्न वाढविणे अत्यंत आवश्यक बाब बनली आहे.

बदलत्या आर्थिक स्थितीचा आढावा घेऊन त्या परिस्थितीशी अनुरूप असे कर्ज धोरण आखणे आवश्यक बनले आहे.

कर्ज खात्याचा दर्जा,उत्पादकता,लाभप्रदता व तरलता व कर्ज व्यवहारातील जोखमीचे चिकित्सक व्यवस्थापन ही काळाची गरज बनलेली आहे. बँकेचे पायाभुत परिस्थिती याबाबीवरच अवलंबून आहे.अचुक कर्जदार शोधणे त्याच्या कर्जाच्या वास्तविक गरजा निर्धारित करणे अत्यावश्यक आहे.त्यासाठी या बँकांच्या कर्ज धोरणामध्ये या बाबींचा सर्वकष विचार करीत आहोत.

मागील वर्षामध्ये मार्च २०२१ मध्ये ७९५१.५४ लाख कर्ज होते.त्यामध्ये वाढ होवून मार्च २०२२ मध्ये ११३.४६ लाखाची निव्वळ वाढ होऊन ती ८०६५.00 लाखापर्यंत झाली.

आगामी काळातील कर्ज धोरण निश्चित करावे लागणार आहे.मार्च २०२२ अखेर ८०६५.00 लाख इतकी कर्जे होती. कर्ज वसुली व दिर्घमुदतीने आलेल्या ठेवी यांचा विचार करून चालु वर्ष मार्च २०२३ अखेर अंदाजे २०.00 कोटी पर्यंत कर्ज रक्कमेमध्ये वाढ अपेक्षित केली आहे.

त्या शिवाय बँकेकडे मार्च २०२२ अखेर रु.५१०.४७ लाख इतके कर्ज नॉन परफार्मिंग असेट म्हणून वर्गवारी केली आहे.प्रथमपासून पाठपुरावा केल्यास वर्षभरात त्यापैकी काही कर्ज उत्पादित करण्याचे उद्दिष्ट ठेवले तरी उत्पन्नामध्ये सरळ वाढ होईल.

SHRI ADINATHA CO-OP. BANK LTD.
R.No. KPR/HLE/BNK (D) 113/96 Dt. 16.1.1996
ICHALKARANJI

चालू वर्ष एप्रिल २०२२ पासून २०००.०० लाख रूपयांची कर्जे वितरीत करावयाची आहेत ही कर्जे कोणत्या ग्राहकांना वितरीत करावयाची ती पुढीलप्रमाणे :-

| | |
|---|---|
| १) मंजूर परंतू न उचललेली | २००.०० लाख |
| २) कॅश क्रेडीट वाढीव | ४००.०० लाख |
| ३) चालू खातेदार नविन कर्ज | ८००.०० लाख |
| ४) सेवक कर्ज | ०५०.०० लाख |
| ५) शेती व शेती पुरक तारण कर्ज | ३००.०० लाख |
| ६) वहाण कर्ज | २००.०० लाख |
| ७) खावटी जामिनकी कर्ज | ०५०.०० लाख |
| **एकूण** ⟶ | **२०००.०० लाख** |

प्राथमिकता ठरवताना प्रथम मंजूर केलेल्या परंतू अदा न केलेल्या कर्जाना द्यावे लागेल तथापी मंजूर झाल्यापासून ही कर्जे ३ महीन्यामध्ये वापरली न गेल्यास व तीन महीन्या नंतर कर्ज मागणी केल्यास पुन्हा रितसर संचालक मंडळाची फेर मंजुरी घेवून कर्ज वितरीत केले जाईल.

रिर्झव्ह बँक ऑफ इंडिया यांनी बँकांना कर्ज देण्यासंबंधी वेळोवेळी परिपत्रके काढली गेली असुन त्यापैकी UBD (PCB) DIR ५/१३५००/९३९४ दि २६ मे १९९४ या परिपत्रकानुसार बँकानी मंजुर करावयाची कमाल मर्यादा पुढे निर्देशित केल्याप्रमाणे दि.१६.०१.१९९६ रोजी नियमित केलेल्या सुचनेनुसार एकूण मुदत आणि मागणी ठेवीशी निगडीत उचल मर्यादा रद्द केलेली असुन ती भांडवल निधीवर आधारीत केलेली आहे.

कमाल मर्यादा रिर्झव्ह बँक परिपत्रक UBD (PCB) MC NO-3,Dt.11Aug.2005 नुसार व्यक्तीगत कर्जदारांच्या बाबतीत १५% व सामुहिक कर्जाच्या बाबतीत २५% निर्धारीत केला आहे.त्या अनुसरुन बँकेचे धोरण राबविणेचे ठरविले आहे.

| | | |
|---|---|---|
| बँकेचे दि,३१.३.२०२२ अखेर | वसुल भागभांडवलः- | **५६९.२७** लाख, |
| | राखीव निधी :- | **३४७.१२** लाख. |
| | इमारत निधीः- | **११९.६९** लाख. |
| | एकूण : | **१०३६.०८ लाख**. |

SHRI ADINATHA CO-OP. BANK LTD. R.No. KPR/HLE/BNK (D) 113/96 Dt. 16.1.1996 ICHALKARANJI

वरील एकूण १०३६.०८ लाख निधीच्या १५% प्रमाणे वैयक्तीक १५५.४१ व सामुहिक २५% प्रमाणे २५९.०२ इतके मर्यादा पर्यंत कर्ज मंजूर करता येईल.

ना हरकत प्रमाणपत्र UBD BOM Plan ८३८/०९०३-०२/९४९५ Dt.12 Aug,१९४४.या परिपत्रकानुसार बँकेने कर्जदारांना कर्ज मंजुर करताना त्या कार्यक्षेत्रातील समान उद्दीष्टांच्या बँकांकडून कर्जदाराने ना हरकत प्रमाणपत्र मिळविणेचा आग्रह धरावा.

**✓अग्रक्रम क्षेत्रास पतपुरवठा–**

RBI Cir No-PCB,6 /09.01/94.95 Dt.25 July 1994 या परिपत्रकानुसार बँकांनी एकूण कर्जाच्या ६०% इतकी कर्जे अग्रक्रम क्षेत्रास व एकूण अग्रक्रम क्षेत्रापैकी किमान २५% किंवा एकूण कर्जाच्या १५% इतका पत पुरवठा दुर्बल घटकांस करणे आवश्यक आहे.

त्यास अनुसरुन बँकेने या वर्षी एकूण कर्ज पुरवठ्यापैकी ६२% रक्कम अग्रक्रम क्षेत्रास व दुर्बल घटकांस ३०% कर्जपुरवठा करण्याचे धोरण निश्चित करणेत आले आहे.

**✓शेती व शेतीपुरक व्यवसायासाठी कर्जे–**

नागरी सहकारी बँकाना शेतीसाठी कर्ज पुरवठा करण्याचे बंधन रिर्झव्ह बँकेने शिथिल केले असुन रिर्झव्ह बँकेचे नियमाचे पालन करुन बँकेने शेती व शेती सुधारणा तसेच शेती पुरक व्यवसायासाठी कर्ज पुरवठा करण्याचा धोरण निश्चित करणेत आले असुन बँकेच्या सभासदांना रु.५० हजार ते १५ लाखा पर्यंत यांच्या मागणीनुसार कर्ज पुरवठा करणेचे ठरविणेत आले आहे. व त्याच बरोबर केंद्र शासन शेती कर्ज माफी मधील पात्र शेतकऱ्यांना त्यांच्या मागणीनुसार कर्ज पुरवठा करणेचे आहे.

पश्चिम महाराष्ट्रात आपला भाग येत असलेने त्यामध्ये प्रामुख्याने ऊस हे पिक जास्तीत जास्त घेतले जात असलेने,भविष्यात बँकेने अशा शेतकऱ्यांसाठी एकरी ४० ते ५० हजारपर्यंत १५ महिने अल्प मुदतीचे ऊस कर्जाची सुविधा उपलब्ध करुन देण्याचा विचार करण्यात आला आहे.व इतर पिकां करीता अल्प मुदतीचे पिक कर्ज धोरण आखुन त्यावर व्याज आकारणी रिर्झव्ह बँकेच्या धोरणानुसार ठेऊन हप्ता वार्षीक स्वरुपात देणेत येईल.त्या करीता सात बारा पत्रक,व आठ अ खाते उतारा अवश्यक राहणार आहे.त्याच प्रमाणे सोसायटी कडून त्यांना कोणत्याही प्रकारची कर्ज घेतलेली असणार नाही याची नोंद घेणे आवश्यक आहे.

**१) शेती सुधारणेसाठी दिलेली कर्जे:–**

शेतीमध्ये करावयाच्या सुधारणांच्या अंदाजपत्रकाप्रमाणे २०% मार्जीन ठेवून कर्जे दिली जातील.यामध्ये एकाच हप्त्यामध्ये कर्जे वितरण न करता कामकाज होईल त्या टप्याने कर्ज वितरण

SHRI ADINATHA CO-OP. BANK LTD. R.No. KPR/HLE/BNK (D) 113/96 Dt. 16.1.1996 ICHALKARANJI

करणेचे आहे. कामकाज पुर्ण झाल्यानंतर पुर्तता दाखला घेतली जाईल कर्ज परतफेडीसाठी शेती उत्पन्न असलेने वार्षिक हप्ता दिला जाईल.

## २) शेती खरेदीसाठी दिलेली कर्जे:-

शेत जमिन खरेदीसाठी खरेदीपत्राच्या ७०% प्रमाणे कर्ज दिले जाईल खरेदीपत्र व तारण गहाण एकाच वेळी केले जाईल आवश्यकता वाटल्यास कर्जदाराकडील स्वत:च्या मालकीची जमिन किंवा इतर प्रॉपर्टी जादा तारण घेतले जाईल. शेती उत्पन्नातुनच कर्जाची परतफेड होणार असलेने वार्षिक हप्त्याने मध्यम व दिर्घ मुदतीचे कर्ज दिले जाईल.

## ३)शेती पुरक व्यवसायासाठी दिलेली कर्जे:-

शेती पुरक व्यवसाय गाय,म्हैस खरेदी, गोठा बांधणी,शेळी कोंबडी पालन,शेत माल प्रक्रिया उद्योग,ट्रॅक्टर, ट्रेलर व शेती अवजारे खरेदी,विहीर बांधकाम,पाईप लाईन,शेतीचा पोत सुधारणा करणे,माती ओढणे इ. अनेक व्यवसायासाठी दिलेली कर्जे यामध्ये येतील.सदर कर्जासाठी आवश्यकता वाटल्यास परतफेडीसाठी सवलतीचा कालावधी दिला जाईल. सदर कर्जाचा कालावधी हा संबंधीत व्यवसायापासून मिळणाऱ्या उत्पन्नावर असल्याने त्याप्रमाणे त्यांना अन्य मध्यम व दिर्घ मुदतीने दिली जाते.

## ४) मालमत्ता तारण कर्ज:-

शितगृहातमध्ये ठेवलेल्या शेती मालाच्या तारणावर कर्ज देताना खालील प्रमाणे पुर्तता करणेत यावी.

१.असे कर्ज देताना शितगृहाच्या मालकाने दिलेल्या स्टोअरेज रिसीट व त्यानुसार शितगृहात प्रत्यक्षात मागणी करणाऱ्या ठेवलेल्या मालावर कर्ज दिले जाईल.

२.असे दिलेले कर्ज पुर्णपणे व्याजासह वसुल झालेनंतरच मुळ स्टोअरेज रिसीट खातेदारास परत केली जाईल.

३.असे कर्ज देण्यापुर्वी शितगृह मालकाकडून बँक कर्जाचा बोजा नोंद केलेबाबत पत्र सादर केल्याशिवाय कर्ज अदा करणेत येऊ नये.

४. मालाच्या किंमतीचा विमा उतरविणेत यावा.

५. सदर तारण मालाची किंमत नेमलेल्या व्हॅल्युएटर कडून घेणेत यावे.

६. असे शितगृह हे कर्जदार अथवा बँकेने मान्य केलेल्या शितगृह असावे.

## ५) शेतीसाठी दिलेली कॅश क्रेडीट कर्जे-

शेती हा सुध्दा व्यवसाय मानून त्यासाठी कॅश क्रेडीट कर्ज दिल्यास त्याचा निश्चितच शेती व्यवसायातील उत्पन्न वाढीसाठी फायदा होतो. शेती मधील निघालेला माल उदा. द्राक्षे पासून बेदाना,केळी, हळद, सोयाबीन इ. मालावर उत्पादन झाल्यानंतर योग्य भाव मिळत नाही त्यासाठी गोडाऊन किंवा स्टोअरेज मध्ये ठेवून योग्य भाव आल्यानंतर विक्री करावी लागते त्यानंतर महिन्याभराने रक्कम शेतकऱ्याच्या हातात मिळते दरम्यानच्या काळात शेती खर्चासाठी रक्कमेची आवश्यकता असते. त्यांना कॅश क्रेडीट कर्ज दिल्यास त्यामधून रक्कम योग्य वेळी वापरता येते त्यामुळे त्याच्या उत्पन्नामध्येही वाढ होते. शेतीस योग्य वेळी खते औषधासाठी रक्कम मिळाल्यास त्याचा निश्चितच उत्पादन व उत्पन्न वाढीसाठी होतो. तसेच ऊस पीक १५ ते १६ महिन्यानंतर कारखान्याला जावून त्यानंतर एका महिन्याने रक्कम येते दरम्यानच्या काळात ऊसासाठी खते, औषधे यासाठी रक्कम खर्च करावी लागते खते व औषधे यांचा योग्य वेळी वापर केल्यास त्याचा उत्पादन वाढीवर त्याचप्रमाणे उत्पन्न वाढीवर होते त्यासाठी त्याला कॅश क्रेडीट कर्जाची आवश्यकता असते शेती उत्पन्न वर्षातून एकदा असलेने कॅश क्रेडीट खातेवर उलाढालीचे बंधन असणार नाही. ऊस बील इतर उत्पादन मालाच्या विक्रीची रक्कम सदर खातेवर जमा होणे आवश्यक आहे.सदर कर्जाची मुदत ३५ महिने राहिल त्यानंतर त्याचे नुतनीकरण केले जाईल. कर्ज मंजुर मर्यादा ही संबंधीत पिकाच्या उत्पन्नावर आधारून ठरविणेत येईल.

## ➢ कर्ज व्याजदर व दंड व्याज आकारणी पध्दत:

रिझर्व बँक ऑफ इंडिया यांनी वेळोवेळी केलेल्या सुचनेप्रमाणे दिलेल्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे कर्जावरील व्याजदराची कमाल मर्यादा ठरविण्यात यावी व वेळोवेळी तसा बदल ही करणेत यावा.

१) शेती व पिक कर्जाची व्याज आकारणी वार्षिक सरळव्याज पध्दतीने करणेत यावा.

२) शेती व्यतीरिक्त इतर कर्जाची व्याज आकारणी मासिक पध्दतीने केली जाईल.

३) थकीत हप्ते व व्याज रक्कमेवर दोन टक्के दंडव्याज आकारणेत यावी. तसेच सदर दंड व्याज आकारणी कमी करणे बदल करणे सूट देणे चे अधिकार संचालक मंडळास राहील.

४) सर्व कर्जाचे वेळोवेळी व्याजदर ठरविणेचा व बदलणेचा अधिकार संचालक मंडळास राहील.

## ➢ कर्जाचा पाठपुरावा:

१)कर्ज ज्या कारणासाठी घेतले आहे, त्याच कारणासाठी विनीयोग केला आहे की नाही ते पाहणे.

२)व्याज व कर्ज हप्ते वेळेवर वसुल करून घेणे.

३)कर्जास दिलेले तारण सुस्थितीत ठेवणे. तसेच सर्व तारण गहाण माल वस्तु मिळकतीबाबत लक्ष ठेवणे.

४) कर्ज खात्यावरील व्यवहार समाधानकारक नसल्यास खातेदारास लेखी व तोंडी सुचना करणे.



SHRI ADINATHA CO-OP. BANK LTD. R.No. KPR/HLE/BNK (D) 113/96 Dt. 16.1.1996 ICHALKARANJI

५) कर्जदारापासून बँकेला थकबाकीचा धोका असल्यास आवश्यक त्या ठिकाणी कायदेशिर मार्गाचा अवलंब करणे व त्याचा पाठपुरावा करणे. म.स.१९६०-१९६१ चे कलम १०१,१०१/९१ व सिक्युरिटी अ‍ॅक्ट कायद्याचा आधार घेणे.

## ➢ कर्ज खातेची पुनर्रचना :

कर्ज खात्याची पुनर्रचना (Restructuring) करणेचा मुख्य उद्देश म्हणजे सदर घटकाची(कर्जदाराची) आर्थिक पत राखणे हा आहे. बँकेनी आणि कर्जदारानी काळजीपुर्वक त्याची व्यवहार्यता तपासुन,खात्यामधील दोष लवकर अजमावून घेऊन आणि पुनर्रचनाची कार्यवाही वेळेत राबवून घेणे.नैसर्गिक आपत्ती ने केलेली पुनर्रचना वगळता खालील मार्गदर्शक तत्वे ही सर्व प्रकारच्या कर्जाच्या पुनर्रचनेकरीता लागू असतील.

कर्जाच्या पुनर्रचनेकरीता पात्रता :-

१.बँकेने वर्गवारी केलेली'Standard' 'Sub Standard' आणि 'Doubtful' केलेली खात्याची पुनर्रचना केली जाऊ शकते.

२.आपली नियमित वर्गवारी करणेची पध्दत आहे तशी चालू ठेवावी.

३.पुनर्रचनेचे पॅकेज मंजूर करणेस विनाकारण वेळ झालेनंतर सदर खाते च्या वर्गवारी मध्ये अधोगती झालेला तो पर्यवेक्षणचा तपासाचा (Supervision) चा भाग होईल.

४.मुळच्या कर्ज करारपत्रामध्ये बदल केल्याशिवाय पुनर्रचना होऊ शकत नाही त्याकरीता कर्जदाराची संमती /अर्ज घेणेत यावेत.कर्जाच्या पुनर्रचनेची कार्यवाही ही पात्र खातेबाबत त्याची नियम व अटी कर्जदाराने मान्य केलेशिवाय होऊ शकत नाही.

५. कर्जदाराची आर्थिक व्यवहार्यता असल्याशिवाय आणि त्याच्याकडून कर्ज परतफेडीची खात्री झाल्याशिवाय बँकेने कोणतेही खाते पुनर्रचनेकरीता घेऊ नये बँकेने कर्जदाराची व्यवहार्यता तपासणी प्रत्येक कर्जदारानुसार करावी.

उदा.कर्जदाराची व्यवहार्यता न बघता, पैशाची आवक,इत्यादी न बघता एखादया खातेचे पुनर्रचना केलेस,ती पुनर्रचना म्हणजे एखाद्या दुर्बल घटकास अर्थसहाय्य करून त्याचा कायाकल्प केलेचा प्रयत्न असेल व सदरची बाब ही कारवाईस आमत्रंण दिल्याचे गृहीत धरले जाईल.

६. फसवणुक (Fraud) आणि खोटेपणा,लबाडी मध्ये सापडलेले ग्राहक पुनर्रचनकरीता कायमपणे अपात्र असतील.

SHRI ADINATHA CO-OP. BANK LTD. R.No. KPR/HLE/BNK (D) 113/96 Dt. 16.1.1996 ICHALKARANJI

## २) सोने तारण कर्ज:-

आपल्या बँकेकडील कर्जदारांना सोने चांदीच्या दागिण्यावर कर्ज देत असताना खालील प्रमाणे दक्षता घेणेत यावी.

१. कर्जदारांकडून तारण देत असलेली दागिण्याची मालकी स्वत:ची असलेबाबत प्रतिज्ञापत्र घेंणेत यावी.

२. बँकेने नेमलेल्या मान्यता प्राप्त सराफाकडून किंमत करून घेणेत यावी.तसेच मुल्यांकणाबाबत वेळोवेळी आर.बी.आय.च्या निर्देषाप्रमाणे मुल्य धरणेत यावे.

३. बुलेट रिपेमेंट बँकेकडील रु,२ लाखचे आतिल सोने गहाण खाती यामध्ये येतील.त्यांना बुलेट रिपेमेंट मंजूरी देणेत यावी.

१. या कर्जासाठी मंजूरीच्या तारखेपासून १२ महिन्याची मुदत देणेत यावे.

२. कोणत्याही क्षणी कर्ज मंजूरी रक्कम २ लाखा पेक्षा जास्त होता कामा नये.

३. व्याजाची आकारणी मासिक करणेत येईल.व होणारे व्याज आणि मुद्दलाची रक्कम कर्जदारांकडून मंजूरीच्या तारखे पासून १२ महिन्यांनी वसुलीस पात्र होईल.

४. सोन्याच्या बाजारातील त्या दिवशीच्या किंमतीच्या एकूण येणे बाकी ७५% पेक्षा जास्त असणार नाही. याची दक्षता घेणेत यावी.

४. रु.२ लाखावरील कर्जासाठी मासिक, तिमाह, सहामाही हप्ते देणेत यावे.

१. सदर कर्ज खातेसाठी इतर कर्जाप्रमाणे ९० दिवसाचे एन.पी.ए.चे नियम लागु होतील.

२.सदर खातेसाठी बुलेट रिपेमेंट लागु होणार नाही.

३. सदर कर्ज खातेची वसुली दिलेल्या हप्त्याप्रमाणे करणेत यावी.

५. कर्जाची परतफेड व्याजासह केल्यानंतर दागिंणे कर्जदारांना परत करून त्यांचेकडून पोहच घेणेत यावी.

६. जेव्हा एखाद्या कर्जदारांने अंशत: रक्कम भरून अंशत: दागिणे मागितलेस त्यांना ते देणेत यावे.परंतु त्यापुर्वी बँकेकडे राहिलेली दागिणे उरलेल्या कर्जासाठी सुरक्षा म्हणून पुरेसे आहेत याची खात्री करून घ्यावी.

## ✓संचालक मंडळास कर्जे:-

SHRI ADINATHA CO-OP. BANK LTD. R.No. KPR/HLE/BNK (D) 113/96 Dt. 16.1.1996 ICHALKARANJI

RBI Cir No-UBD/BPD/Cir/५०/१३.०५.००/२००२-०३ नुसार संचालक मंडळास न कर्ज देणे बँकांना बंधन कारक आहे.त्याची आंमलबजावणी या पुढे ही चालु रहावी असे कर्ज धोरणात ठरविणेत आले आहे.तथापि यामध्ये रिर्झव्ह बँकेचे वेळोवेळी होणारी बदल आपोआप लागु राहतील.

### ✓कर्ज धोरण हेतू:

बँकिंग व्यवहारामध्ये प्रमुख भाग हा कर्ज वाटपाचा असतो. हा व्यवहार अधिक शास्त्रशुध्द व्हावा,धोक्याचा होऊ नये कर्ज व्यवहाराची दिशा दाखविणार व्हावा.असे धोरण ठरविण्यामागचा हेतू आहे. त्याच प्रमाणे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि सहकार खाते, महाराष्ट्र राज्य यांचाही असे धोरण ठरवावे असा आग्रह आहे. त्या पुर्ततेसाठी हे धोरण ठरविण्यात येत आहे.

### ✓ कर्ज कोणास मिळेलः

या धोरणाअंतर्गत द्यावायाचे कर्ज हे बँकेचे व्यक्ति सभासद, सभासद संस्था, व्यक्तीगत नाममात्र सभासद यांनाच मिळू शकेल.

### ✓ अर्ज करण्याची पध्दतः

बँकेकडे करावयाचा कर्ज मागणी अर्ज हा बँकेने तयार केलेल्या छापील अर्जातच असला पाहिजे. सदर अर्ज बँकेतुन नोंद करुन घेतला पाहिजे, अशा प्रकारच्या छापील अर्जात अर्जदारासंबंधी सर्व माहिती,त्याचा व्यवसाय,व्यवसायाचे उत्पन्न,कर्जाचे कारण,कर्जासाठी तारण,मागणी कर्जाची रक्कम, कर्जाचे स्वरूप,तारणाची किंमत,दिलेले जामिनदार व त्यांची पात्रता अर्जदार व जामिनदार यांच्या राहण्याच्या व व्यवसायाच्या जागेचा पत्ता व अर्जात मागितलेली अन्य माहिती या सर्व बांबी संदर्भात कागदपत्रे जोडून सर्व माहिती देणे आवश्यक आहे. कर्ज मागणी अर्जावर कर्जदाराची व जामिनदारांची सही असणे आवश्यक आहे. जामीनदाराने सर्व माहिती देणे आवश्यक आहे.तसेच अर्जावर अर्जदार व जामीनदार यांचे फोटो चिटकविणे आवश्यक आहे. अशा रितीने संपुर्णपणे भरलेला अर्ज बँकेच्या ज्या शाखेत कर्जदाराचे बचत किंवा चालु ठेव/कर्ज खाते आहे त्या शाखेत देणे आवश्यक आहे व तेथुन पुढे त्या अर्जावरील पुढील प्रक्रिया चालू होईल.

### ✓ कर्ज किती मिळेल?

रिझर्व्ह बँक वेळोवेळी सुचित करेल त्या पध्दतीने 'व्यक्तीगत मर्यादा'(Individual Exposure Limit) आणि 'सामुहिक मर्यादा' (Group Exposure Limit) पर्यंत कर्ज मर्यादा मंजूर होतील.कर्जदाराच्या मंजूर करावयाच्या विविध प्रकारच्या कर्जाच्या एकत्रित मर्यादा या नेहमी वर सुचित केलेल्या मर्यादेचे आत असतील. यास अपवाद केवळ विविध प्रकारच्या ठेव तारणावर दिलेल्या कर्जाचा राहील. अशा प्रकारच्या मर्यादा ही आर्थिक वर्षात दि ३१ मार्च व ३० सप्टेंबर या दोन तारखांना बँकेच्या भांडवली निधीवर ठरविण्यात येतील.कांही कारणांमुळे अशी मर्यादा कमी झाली आणि त्यामुळे त्या दिवसांची येणे बाकी ही मर्यादेपेक्षा जादा असली तरी ही ज्यादा येणे बाकी त्या तारखेपासुन २ वर्ष किंवा दिलेली मुदत यापैकी जो काळ कमी असेल त्या काळात वसुल करावयाची आहे.

### ✓ कोणते कर्ज मिळेल?

SHRI ADINATHA CO-OP. BANK LTD.
R.No. KPR/HLE/BNK (D) 113/96
Dt. 16.1.1996
ICHALKARANJI

बँकेच्या सभासदांना सर्व प्रकारची तारणी कर्जे आणि विनातारणी कर्जे मिळतील.नाममात्र सभासदांना रिझर्व बँकेच्या आदेशांना पात्र राहुन रिझर्व बँकेने सुचित केलेल्या तारणांवर,उद्देशासाठी आणि सुचित मर्यादेपर्यंत कर्ज मंजुर करता येईल.

**✓कर्जदार कोण?**

| | | |
|---|---|---|
| अ) शेतकरी | ब)उद्योजक | क)व्यापार करणारे |
| ड)वाहतुक करणारे | इ)व्यवसायिक | फ)स्वयमरोजगारदार |
| ग)नोकरदार | ह)विद्यार्थी | |

**✓कर्जाचे उद्देशः**

खालील उद्देशासाठी कर्ज देता येईल.

| | |
|---|---|
| १.शेतीमाल उत्पादनासाठी | २.शेती विषयक बांबीसाठी/ सुधारणासाठी |
| ३.शेती पुरक व्यवसायांसाठी | ४.औद्योगिक व्यवसायांसाठी |
| ५.वाहतुक व्यवसायांसाठी | ६.व्यापारासाठी |
| ७.विविध उद्योग/ व्यवसाय करणेसाठी | ८.जागा व इमारत खरेदी,बांधणी,सुधारणा |
| ९.वाहन खरेदी | १०.घरगुती वस्तु खरेदीसाठी |
| ११.फलोत्पादनासाठी | १२. सेवा उद्योगासाठी |

१३.संचालक मंडळास योग्य वाटेल अशा अन्य कारणांसाठी

**✓कर्ज कोणत्या प्रकारचेः**

**अ)**बँकेमार्फत खालील प्रकारची कर्जे देता येतील.

१.मुदती कर्जे: अ) अल्प मुदत (१५ महिन्यांसाठी),
ब) मध्यमुदत (१६ ते ६०महिन्यांपर्यंत),
क) दिर्घ मुदत (६० महिन्यांचेवर)

२. घर तारण कर्ज- (१५ वर्षे दिर्घ मुदत कर्जे )..

| | |
|---|---|
| ३.कॅश क्रेडिट, | ४. सोनेतारण कर्ज १२ महीनेमुदत |
| ५.लेटर ऑफ क्रेडिट, | ६. बँक गॅरंटी, |
| ७.चेक/डी डी/हुंडी डिस्काऊंटिंग, | ८. प्रोजेक्ट कर्जे, |
| ९.ओव्हर ड्राफ्ट -कायमस्वरुपी /तात्पुरता. | १०.डिस्काऊंटिंग /बिल्स पर्चेस |

SHRI ADINATHA CO-OP. BANK LTD. R.No. KPR/HLE/BNK (D) 113/96 Dt. 16.1.1996 ICHALKARANJI

ब) बँकेमार्फत विविध व्यवसायासाठी,विविध प्रकारच्या कर्जदारांसाठी, विविध प्रकारची कर्जे ही खालील प्रकारची असतील.

१.विविध तारणावरील तारणी कर्जे, २.अन्य व्यक्तीच्या जामीनकीवर,

३.कर्जदाराचे स्वतःचे जामीनकीवर

### ✓ कोणते तारण ?

अ) बँक खालील प्रकारची तारणे स्वीकारेल.

१.वस्तु-शेती उत्पादीत फळफळावर,औद्योगिक वस्तु,व्यापारी वस्तु,उत्पादीत व भुसारी वस्तु,

२.सोने-चांदी दागिने /भांडी, ३.वाहन-स्वयंचलित,

४.स्थावर /जमिन ५.मशिनरी / यंत्रसामुग्री

६.पशुधन/पक्षीधन, ७.पीक तारण.

आ) बँक कागदोपत्रीचे खालीलप्रमाणे तारण स्वीकारेल.

१.बँकेतील मुदत ठेवी, २.पोस्ट खातेतील विविध ठेवी,

३.केंद्र सरकार व महाराष्ट्र राज्याने काढलेले कर्ज रोखे, ४.विश्वस्त रोखे,

६.जिवन विमा पॉलीसीवर,

५.मान्यताप्राप्त वखार पावत्या, ७.पुस्तकी येणे,

८.विक्री व सेवा पोटी काढलेली बिले, ९.खरेदीकरार,

### ✓विनातारणी कर्जे :

बँकेच्या सभासदांना रिझर्व बँकेंच्या आदेशास पात्र राहून ,रिझर्व बँकेने ठरवून दिलेल्या मर्यादेपर्यंत कर्ज मंजूर केले जातील. अशी कर्जे सर्वसाधारणपणे मुदती कर्जे असतील व ती जास्तीत जास्तीत जास्त ५ वर्षे मुदतीची राहतील कर्जदाराची क्षमता ,पुर्वानुभव लक्षात घेऊन कोणत्याही प्रकारचे जामिनदार न घेता सभासदांना रू ५०,०००/- कर्ज मंजूर करता येईल.

### ✓तारणाची किंमत :

कर्जापोटी बँक स्विकारीत असलेल्या तारणाची किंमत हि खालील पध्दतीने करणेत येईल.

१. तारणाच्या खरेदीची बिले.

२. संबधित तारणाची त्या क्षेत्रातील तज्ञांनी केलेली किमंत .

३. बाजारभावांने होणारी किमंत.

४. विशिष्ट तारणांच्या संबधात त्या अधिकृत संस्थेने केलेली किमंत.

५. शेती कर्जाकरीता शितगृहातील मालाच्या किंमतीची पावती.

R.No. KPR/HLE/BNK (D) 113/96 Dt. 16.1.1996 ICHALKARANJI

✓ दुरावा.

कर्जदारांनी देवू केलेल्या तारणापोटी कर्ज पुरवठा करतांना त्या तारणामध्ये कर्जदाराचा सहभाग असावा म्हणून तारणांच्या किमतीएवढा कर्ज पुरवठा केला जाणार नाही अशा प्रकारे दुराव्याचे प्रमाण संचालक मंडळ ठरवतील त्या प्रमाणात राहील तथापि सर्व बाबतीत रिझर्व बँकेचे आदेश/नियम बंधनकारक राहील

| अ न | तारणाचा प्रकार | ठेवावयाचा दुरावा |
|---|---|---|
| १ | सोने/चांदीचे दागिने/वस्तू | संचालक मंडळ ठरवेल त्याप्रमाणे १५ ते २५% |
| २ | वाहन/मशिनरी नवी जुने | १५ % ते ४० % |
| ३ | औदयोगिक कच्च्या /प्रक्रिया येतील माल पक्का/व्यापारी माल यांचे | |
| | १.नजरगहाण | २५% |
| | २.ताबेगहाण | २०% |
| ४ | वखार पावती | २५% |
| ५ | १.स्थावर मालमत्ता | २०% |
| | २.नवीन | २५% |
| | ३.जुनी | २५% |
| ६ | ठेवीच्या तारणावर | ५% |
| ७ | सरकारी/विश्वस्थ संस्थांचे कर्जरोखे नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेट | २५% |
| ८ | कंपनी भाग/डिबेंचर्स | ५०% |
| ९ | आयुर्विमा पॉलिसी | २५% |
| १० | बिल्स हुंडी | २५% |
| ११ | सेन्सेटिव्ह वस्तूंचे तारणावर | रिझर्व बँकेच्या आदेशानुसार |
| १२ | घरगुती वस्तू | २५% |
| १३ | व्यापारी येणे (बुक डेटस) | ४०% ते ५०% |
| १४ | शेती खरेदी तारण | ३० % |

तथापि रिझर्व बँकेच्या आदेशानुसार या दुराव्यात वेळोवेळी बदल केला जाईल.

SHRI ADINATHA CO-OP BANK LTD. R.No. KPR/HLE/BNK (D) 113/96 Dt. 16.1.1996 ICHALKARANJI

**✓कर्ज मंजूरी :**

बँकेमार्फत मंजूर होणारी कर्जे ही मुलत: रिझर्व बँकेचे कर्ज विषयचे आदेश,नियम, सुचना,सहकार खात्याचे आदेश,बँकीग रेग्युलेशन अॅक्ट,महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा व नियम आणि बँकेचे पोटनियम यातील तरतूदीस आणि या नियमांना पात्र राहतील.

**✓कर्ज मंजूरीचे अधिकार :**

कर्ज मंजूरीचे अधिकारी हे संचालक मंडळाचे राहतील. तथापि संचालक मंडळ हे अधिकार त्यांनी नेमलेल्या उपसमित्यांना किंवा व्यक्तींना ठराव करून प्रदान करू शकेल. तथापि संचालक मंडळ ठराव करून ठरविलेल्या मर्यादेची मंजूर केलेली कर्जाची माहिती संचालक मंडळापुढे येईल. कर्ज नामंजूर करण्याचा अधिकार हा संचालक मंडळाला राहील. तसेच कर्ज नामंजूरीची कारणे देण्याचे बंधन संचालक मंडळावर नाही. एखादे कर्ज नामंजूर झाल्यास,नामंजूरीच्या तारखेपासून ३ महिन्यांचे आत त्याचा फेरविचार होणार नाही.

**✓व्याजदर :**

व्याज दर ठरविण्याचा अधिकार हा संचालक मंडळाचा राहिल तथापि असा व्याज दर ठरविताना रक्कमेप्रमाणे व्याज दराचे स्लॅब करणे क्रेडीट रेटींग नुसार व्याजाचे दर ठरविणे व ते सर्वांना समानतेने लागु करणेचा अधिकार संचालक मंडळाच्या धोरणानुसार व रिर्झव्ह बँकेच्या नियमानुसार असतील. यातील बदल हे त्या त्या स्वरूपात लागु राहतील.

**✓व्याजाची आकारणी :**

१. कर्जावरील व्याजाची आकारणी द.सा.द.शे. दरमहा पध्दतीने होईल.ही पध्दती ठरविण्याचा अधिकार संचालक मंडळाला राहील.
२. रिझर्व बँकेच्या वेळोवेळीच्या आदेशास अनुसरून व संचालक मंडळाच्या विचार विनिमयानुसार वेळोवेळी कर्जावरील व्याजदर निश्चित करेल.
३. व्याजदरात होणारा बदल कर्जदारांवर बंधनकारक राहील.
४. मुदती कर्जावर/ कॅश क्रेडिटवर/ ओव्हर ड्राफट अशा प्रकारच्या कर्जावर व्याजाची आकारणी दैनंदिन बाकी पध्दतीवर होईल. प्रत्येक महिना अखेर व्याज नांवे टाकले जाईल.
५. बिल डिस्काउंटीग मर्यादेवरील व्याज बिल डिस्काउंट करतेवेळी आगाउ वसुल केले जाईल.
६. ठेव तारण कर्जा करिता व्याजदराबाबत दुरावा ठेवत असताना ठेव तारण कर्जाकरीता १% व्याज दुरावा ठेवणेत येईल.
७. शेती करीता रिझर्व बँकेच्या नियमानुसार व्याज आकारणी करणेत येईल.
८. अशा रितीने आकारावयाचे व्याज हे रिझर्व बँकेच्या सुचना नुसार राहील.
९. व्याज दरात केले जाणारे बदल बँकेच्या नोटीस बोर्डावर लावले जातील.

SHRI ADINATHA CO-OP. BANK LTD. R.No. KPR/HLE/BNK (D) 113/96 Dt. 16.1.1996 ICHALKARANJI

**✓दंड व्याज :**

बँकेने ठरवून दिलेल्या तारखेस कर्जाचा हप्ता न आलेस किंवा कॅश क्रेडिट, ओव्हर ड्राफ्ट , बिल डिस्काउंटींग मर्यादा मुदत संपणेपूर्वी नुतनीकरण न झालेस बँकेकडून दंड व्याज आकारले जाईल. हा दर २ टक्के राहील. त्याचप्रमाणे कॅश क्रेडिट कर्ज मर्यादेच्यावर खातेवर उचल झालेस अशा प्रकारच्या जादा उचल झालेल्या रक्कमेवर २ टक्के जादा व्याजदराने व्याज आकारणी केली जाईल.

**✓ सवलतः**

बँकेकडे बऱ्याच काळापासुन थकीत असणाऱ्या कर्ज खात्याबाबत त्याच प्रमाणे कोर्ट मॅटर चालु असणाऱ्या खात्याबाबत,तसेच एन. पी. ए.वसुली करीता कोणत्याही प्रकारचे सोर्स नसलेल्या खात्याबाबत संचालक मंडळाने निरनिराळे उपाय योजना करुन सवलती देऊन अशी कर्जे वसुल करणेसाठी प्रयत्न करावे लागणार आहेत.यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा विचार करावा लागणार आहे.

१. कर्जामध्ये सवलत देत असताना सदर कर्जदारास कोणत्याही प्रकारे मुद्दलामध्ये सवलत मिळणार नाही.

२. कर्जखात्यावर दंड व्याजाची सवलत देवून कर्ज रक्कम वसुल करणे.

३. कर्जखात्यावर दंड व्याज,नोटीस फी,व इतर चार्जेस वजा जाता राहिलेली रक्कम वसुल करणे.

४. कर्जदाराने घेतलेल्या तारखेपासुन सरळ व्याजाने सक्कम घेवून कर्ज खाते वसुल करणे.

५. ओ. टी. एस. प्रमाणे रक्कम भरुन घेवून कर्ज खाते वसुल करणे अशा वेळी सदर खात्याच्या ओ.टी.एस. बाबत सि.ए.(चार्टड अकौंटट ) यांच्या कडून सदर खात्याबाबत लेखी सर्टीफिकेट घेवून रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार वसुल करुन घेणे.

६. कोर्टामध्ये चालू असणऱ्या केसीस बाबत कोर्ट हुकुमाप्रमाणे वसुल करणे.

७. केंद्रशासन,महाराष्ट्र शासन,बँकेचे संचालक मंडळ यांनी वर उल्लेख केलेल्या सवलती बाबत पुर्णबांधणी करणे

इ.सदर सवलतीबाबत वसुली विभागाकडून त्यांच्या अनुभवाचा सविस्तर रिपोर्ट घेणे.

**✓कागदपत्रे :**

कर्जप्रकार निहाय व कारण निहाय कर्ज आदा करतांना कोणती कागदपत्रे घ्यावीत याचा तपशिल संचालक मंडळाने ठरविला असून त्याप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता कर्जदारानी करावयाची आहेत व सदर कागदपत्राची यादी कर्ज अर्जासोबत जोडलेली आहे.

**✓कर्जावरील देखरेख :**

कर्जाचा वापर आणि विनियोग तपासणेसाठी , तारणाची स्थिती अजमाविण्यासाठी बँक कर्जावरील देखरेख पध्दतीचा अवलंब करेल याचा तपशिल पध्दत ठरविणेचा व बदल करणेचा अधिकार हा संचालक मंडळास राहील.

SHRI ADINATHA CO-OP. BANK LTD. R.No. KPR/HLE/BNK (D) 113/96 Dt. 16.1.1996 ICHALKARANJI

✓ **कर्ज मागणी अर्जाची छाननी :**

कर्जदारांने केलेल्या कर्ज मागणी अर्जाची बँकेमार्फत छाननी होईल. ही छाननी करतांना खालील मुददयांचा विचार केला जाईल.

१. कर्जदारांची पात्रता .
२. कर्जदारांची व्यवहारातील गुतंवणूक .
३. कर्जदाराच्या व्यवसायाचे स्वरूप.
४. कर्जदाराच्या व्यवसायाची स्थिती .
५. कर्जदारांने देवू केलेले तारण व त्याची स्थिती अणि किमंत .
६. कर्जदाराला दयावयाचे कर्जाचे स्वरूप .
७. कर्जदाराने देवू केलेल्या तारणाच्या अनुषंगाने सहतारणाची आवश्यकता .
८. कर्जदारांच्या कर्जपरतफेडीची क्षमता .
९. मंजूर करावयाची रक्कम व त्याच्या अटी .
१० तारणावर बोजा निर्माण करावयाची पध्दत .
११ कर्जावरील व्याजदर .
१२ कर्जाचा कालावधी .

कर्ज मागणी अर्जाच्या बाबतीत छाननी व अन्य फी

✓ **कर्ज वितरणाची पध्दत :**

मंजूर केलेली मुदत कर्जे ही कर्जदारांच्या बचत खाते/चालू खाते/कॅश क्रेडीट खाते यावर जमा केली जातील अथवा नजरगहाण कर्जे डिमांड डॉप्टने देणेत येतील .

सर्व प्रकारची कर्जे मुख्य तारण किंवा सहतारण रजिस्टर मार्गेज दस्तानुसार तारण मिळकतीवर बँकेचा बोजा नोंद करून अदा करणेत यावीत.

✓ **क्षेत्रनिहाय कर्ज मंजूर मर्यादा :**

१. बँकेची प्रत्यक्ष मंजूर कर्जे ही कर्ज देणे योग्य निधीच्या १० टक्के पेक्षा जास्त असणार नाहीत.
२. बँकेच्या ठेव रकमेच्या ७० टक्केपेक्षा जास्त कर्जे येणे बाकी राहणार नाही .
३. बॅकेने मंजूर करावयाची जामिनकी कर्जे/विनातारणी कर्जे ही एकूण कर्जाच्या १० टक्केपेक्षा जास्त असणार नाहीत .
४. बँकेच्या सेवकांना मंजूर करावयाची सर्व प्रकारची मिळून एकूण कर्जे ही बॅकेच्या कर्ज ठेवीच्या १/२ पेक्षा जास्त असणार नाहीत .
५. नाममात्र सभासदांना दयावयाची कर्जे ही एकूण कर्जाच्या ५ टक्केपेक्षा जास्त असणार नाहीत.
६. बॅकने सभासदांना कर्ज मंजूर करतेवेळी रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे कर्ज रक्कमेच्या प्रमाणात भाग रक्कम कपात करुन घेणेत यावी.

SHRI ADINATHA CO-OP. BANK LTD. R.No. KPR/HLE/BNK (D) 113/96 Dt. 16.1.1996 ICHALKARANJI

### ✓ नाममात्र सभासदांना दयावयाची कर्जे

नाममात्र सभासदांना दयावयाच्या कर्जाचे धोरण ही बँकेचे संचालक मंडळ वेळोवेळी परिस्थितीचा आढावा घेवून ठरवेल.तथापि असे धोरण ठरवितांना या सदंर्भातील रिझर्व बँकेचे नियमांचे पालन केले जाईल .

### ✓ बोजा निर्मिती .

बँकेने स्विकारलेल्या तारणावर खालील प्रकारे बॅकेचा बोजा निर्माण केला जाईल .

१. लिन
२. निगेटिव्ह लिन
३. नजरगहाण
४. ताबेगहाण
५. गहाणखत
६. असाइनमेंट वेतनव्दारा

### ✓ कर्जदारास आकारावयाच्या अन्य रक्कमा

कर्जदारास आकारावयाच्या अन्य रकमा या खालील प्रमाणे असतील याचे दर संचालक मंडळ वेळोवेळी ठरविल तो लागू राहील.

१. हताळणी फी (Processing Fee)
२. तपासणी फी (Inspction Fee)
३. कागदपत्र फी (Document Fee)
४. कस्टडी फी (Custoday Fee)
५. विमा फी ( Insurance Fee) Services Tax
६. प्रत्यक्ष पहाणी फी (Visit Fee)
७. सेवा शुल्क (Services Tax)
८. शेअर्स कपात (Shares linking)

या व्यतिरिक्त कर्जदारांने वकील फी मुल्याकंन फी व इतर आवश्यक कागदपत्रे फी ही संबधितांना परस्पर देणेची आहे.

### ✓ जामिनदार :

१. ठेव तारण व सोने तारण कर्जे वगळता कर्जदाराला बॅकेच्या पसंतीचे आवश्यकतेनुसार २ किंवा ३ जामिनदार दयावे लागतील. हे जामिनदार बँकेचे 'अ' किंवा 'ब' वर्ग सभासद असणे आवश्यक आहे.
२. नाममात्र सभासद कर्जासाठी जामिनदाराची आवश्यकता आहे.
३. एक व्यक्ति केवळ ४ कर्जदारांना जामिन राहू शकते. सदर जामिनकीचा बोजा त्याच्या वार्षिक उत्पन्नाच्या २० पटीपेक्षा जास्त असणार नाही.
४. योग्य परिस्थितीत योग्य कारणासाठी येणे बाकी रक्कमेची पुनररचना /पुनरबांधणी संचालक मंडळ करू शकेल.

SHRI ADINATHA CO-OP BANK LTD. R.No. KPR/HLE/BNK (D) 113/96 Dt. 16.1.1996 ICHALKARANJI

✓ **कर्ज कोणाला देवू नये :**

१. बँकेच्या स्वत:च्या शेअर्स तारणावरती कोणास कर्ज अदा करता येणार नाही.

२. बँकेच्या संचालकांना कर्ज देता येणार नाही.

३. कोणतीही कंपनी अथवा संस्था की ज्यामध्ये बँकेचे संचालक हे भागीदार,जामिनदार किंवा व्यवस्थापनात सहभाग असलेल्या संस्था अथवा कंपनीस कर्ज अदा करता येणार नाही.

४. बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांना त्यांचे फर्म अथवा कंपनी संबंधीत संस्था किंवा त्यांचा सहभाग असणाऱ्या संस्थांना विना तारणी/तारणी कर्ज अदा करता येणार नाही.(दि.०१.१०.२००३ पुर्वी अदा केलेली कर्जे आहेत ती कर्जे मुदती अखेर चालु राहतील अशी कर्जे रिन्युअर करता येणार नाही.)

अपवाद–

१. कर्मचारी जर संचालक बोर्डावरती संचालक म्हणून काम पाहत असेल.

२. ठेव/विमा पॉलीसी तारण ठेव संचालकांना कर्ज अदा करता येईल.

✓ **कर्ज पुनरावलोकन यंत्रणा (Loan Review Mechanism)**

बँकेच्या कर्जदारांच्या गुणवत्तेचे निरंतर मुल्यांकन करण्यासाठी आणि पत प्रशासन सुधारणा घडवून आणण्यासाठी कर्ज पुनरावलोकन यंत्रणा हे एक प्रभावी साधन आहे. म्हणून बँकांनी मोठया प्रमाणात खात्यांकरीता कर्जाच्या प्रशासनाच्या कार्यक्षमतेचे मुल्यांकन करणे,कर्ज तोटयाच्या तरतुदीचे मुल्यांकन करणे,कर्जदारांची गुणवत्ता इ.जबाबदारी असलेल्या विविध मुल्य खात्यांसाठी योग्य कर्जाचे पुनरावलोकन यंत्रणा ठेवली पाहिजे. सदरच्या यंत्रणेची जटिलता आणि व्याप्ती साधारणपणे बँकांचा आकार, ऑपरेशन प्रकार आणि व्यवस्थापण पध्दतीवर अवलंबून आहे

कर्ज पुनरावलोकन यंत्रणाचा मुख्य उद्देश म्हणजे कर्जामध्ये असणारी कमतरता तात्काळ ओळखून त्याच्यावर त्वरीत सुधारात्मक कारवाईस प्रारंभ करणे हा आहे. त्याकरीता खालील गोष्टीची खात्री प्रत्येक कर्जदार कडून घेणेत येईल.

- कर्ज पुनरावलोकन यंत्रणाचा मुख्य उद्दिष्टे–

१.कर्ज कमकुवतपणा करणाऱ्या आणि वेळेवर सुधारात्मक कारवाईस प्रारंभ करणारी त्वरीत कर्जे ओळखणे.

२.कर्जदारांचे गुणवत्ता मुल्यांकन करणे आणि संभाव्य समस्या क्षेत्रे अलग ठेवणे.

३.कर्ज तोटयाच्या तरतुदीची पर्याप्तता निश्चित करण्यासाठी माहिती प्रदान करणे.

४.कर्जाचे धोरणे आणि कार्यपध्दती आणि त्याचे पालन आणि पालन करण्यासाठी आवश्यक कायदे आणि नियमांचे पालन करण्यासाठी त्यांचे परीक्षण करणे.

SHRI ADINATHA CO-OP. BANK LTD. R.No. KPR/HLE/BNK (D) 113/96 Dt. 16.1.1996 ICHALKARANJI

५.क्रेडीट मंजूरी प्रक्रिया ,जोखीम मुल्यमापण आणि मंजूरी नंतरचा पाठपुरावा यासह क्रेडीट प्रशासनवरील माहितीसह शीर्ष व्यवस्थापण प्रदान करणे.

६.पुनरावलोकनाच्या निष्कर्षावर व्यवस्थापकांशी चर्चा केली पाहिजे आणि सर्व कमतरतेसाठी सुधारात्मक कृती केल्या पाहिजेत.निराकरण न करता राहिलेल्या कमतरता नोंदविल्या पाहिजेत.

७.खालील निकषा आधारे कर्ज पुनरावलोकन यंत्रणा राबविली जाईल.

**१) टर्म लोन :**

१.कर्जदारांने ज्या कारणाकरीता कर्ज मंजूर करून घेतले आहे त्याच कारणाकरीता सदर कर्जाचा विनियोग झाला आहे याची खात्री केली जाईल.

२.आर्थिक सहाय्य केलेल्या प्रत्येक युनिटला भेट देणे व तारण मालमत्तेची पाहणी करून ते सुस्थितीत असलेची खात्री केली जाईल.

३.कर्ज वितरणापासून हप्ता भरणे संदर्भात पाठपुरावा केला जाईल.

४.जर कर्जदाराच्या परतफेडीबाबत शंका उत्पन्न झालेस तर वसुली करीता त्यांना नोटीस देणे.

५.कर्ज परतफेडीस अनुसरून सदर कर्जाचे योग्य ते एन.पी.ए.वर्गीकरण केले जाईल.

६.आवश्यकते नुसार पुनरावलोकन निकष संचालक मंडळापुढे ठेवले जाईल.

**२) कॅश क्रेडीट लोन :**

१.कॅश क्रेडीट खात्याबाबत खेळत्या भांडवला करीता मंजूर झोलेली रक्कम त्याला पुढील काळाकरीता तितकीच गरजेची आहे खात्री करून त्याची ड्राविंग पॉवर कमी अथवा तितकीच ठेवणे

२.कॅश क्रेडीट खात्यातून नियमित होणारे पेमेंट हे व्यवसायास आवश्यक बाबी करीता केले जाईल याबाबत नियमित खात्री केली जाईल.

३.कर्जदाराच्या नियतकालीन प्रगती अहवाल /आर्थिक कागदपत्राची छाननी करणे.आवश्यक तेथे त्याची कर्ज वसुली कमिटीमध्ये नोंद घेतली जाईल.

४.आर्थिक सहाय्य केलेल्या प्रत्येक युनिटला भेट देणे व तारण मालमत्तेची पाहणी करून ते सुस्थितीत असलेची खात्री केली जाईल.

५.आवश्यकते नुसार पुनरावलोकन निकष संचालक मंडळापुढे ठेवले जाईल.

✓ **कोविड -१९ आर्थिक आपत्तकालीन परिस्थिती बाबत-**

प्रस्तावना-वेगवेगळया आपत्ती प्रमाणे देशाला/राज्याला दक्ष राहून काम करावे लागते. नेहमीच येणारा दुष्काळ ,पुर परिस्थिती, भुस्खलन, वणवा या आपत्तीचा सामना

करण्यासाठी देशाकडे /राज्याकडे अनुभव होता. पण कोरोनासारख्या अत्यंत वेगाने पसरणा-या संसर्गजन्य रोगाचा सामना करणे हा स्वातंत्र्योत्तर भारतातील साथरोगाशी सामना करण्याचा पहिला प्रयोग होता. या आजारा बाबत असलेली अल्पशी

माहिती,समज-गैरसमज यातुन या आजाराशी सामना करण्यासाठी योग्य निर्णय घेणे,त्याची अंमलबजावणी करणे हे कार्य सुरू झाले. मार्चच्या सुरूवातीला देशात हातपाय पसरण्यास सुरूवात केलेल्या या महामारीच्या साथीच्या संसर्ग बाधितांचे आकडे आज काही लाखांत आहेत. कोरोनाच्या विरोधातील लढाईत देशाची /राज्यांची महत्वाची भुमिका राहिली. या रोगाने जग थांबले. जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन आज बदलला आहे.

कोरोनोत्तरही देशातील आर्थिक व्यवस्था कोलमडली आणि या काळात केंद्र सरकार/अर्थ मंत्रालय /आर.बी.आय.आपली जबाबदारी पार पाडण्यात तत्पर असणार आहे. कालांतराने यावर लस आल्यानंतर कोरोना हा आठवणीचा विषय म्हणून शिल्लक राहील.

याबाबत आर.बी.आय.ने पुढील उपाय योजना सुचविलेल्या आहेत.

**१.मोरॅटोरिअम पिरीयड –**

संपूर्ण देशात सध्या कोवीड-१९(कोरोना व्हायरस) या रोगाच्या संक्रमण व महामारी फैलावाच्या परिस्थितीत आरबीआय च्या दि.२७ मार्च २०२० रोजीच्या सुचने प्रमाणे व्यवसायातील आर्थिक ताण कमी करणेसाठी व बँकांना हप्ताचा दबाव कमी करणेच्या उद्देशाने बँकेकडील कर्जदारांना कर्ज हप्तेमध्ये तीन महिन्याकरीता मोरॅटोरिअम पिरीयड (हप्ता सवलतीचा कालावधी) देणेचे सुचना केलेली आहे. तसेच त्यानंतर केंद्र सरकारने लॉकडाऊन केलेच्या धर्तीवर दि.३१ मे २०२० रोजी आरबीआय ने पुन्हा नविन ३ महिने चा वाढीव मोरॅटोरिअम पिरीयड (हप्ता सवलतीचा कालावधी) वाढवणेची सुचना केलेली आहे.(सदर एकूण ६ महिने मोरॅटोरिअमचा कालावधी ३१ ऑगष्ट-२०२० रोजी संपत आहे.)

वरील बाबीचा विचार करून संचालक सभेमध्ये याबाबत चर्चा होऊन बँकेकडील मुदत कर्जदारांना(Term Loan)त्यांचे लेखी अर्ज घेऊन मोरॅटोरिअम पिरीयड देणेचे ठरले. त्याप्रमाणे आपल्या बँकेने सर्व मुदत कर्ज (टर्म लोन) खातेदारांना आरबीआय च्या नियमाप्रमाणे ३+३ असे ६ महिने मोरॅटोरिअम पिरीयड देणेचे ठरविले आहे. यामध्ये कर्जदारांची कर्जाची मुदत ६ महिने वाढणार असलेचे सभेच्या निदर्शनास आणणेत आले. सदरचे मोरॅटोरिअम वाढीसाठी बँकेकडील सॉप्टवेअरमध्ये योग्य ते बदल करणेत यावे तसेच याची कार्यवाही करणेसाठी आवश्यक बदलास ही सभा मंजूरी देत आहे व देणेत आले.

**२.कोविड-१९ लोन कर्ज वितरण बाबतः**-सध्याच्या कोविड १९ या रोगाच्या पार्श्वभुमीवर रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार व्यवसायातील आर्थिक ताण कमी करणे,व्यवसायातील आर्थिक देणी भागविणे व व्यवसायास उभारी आणणे या करीता आरबीआयने सध्या असणा-या कर्जदारांना २०% जादा कर्ज वितरीत करणेचे सुचविलेले आहे. सदर बाबीवर आधारीत बँकेने खालील कर्ज वितरीत करणेची कर्ज स्किम तयार केलेली आहे.

**कर्ज प्रकार -: कोविड-१९ रिलिफ लोन**

SHRI ADINATHA CO-OP BANK LTD. R.No. KPR/HLE/BNK (D) 113/96 Dt. 16.1.1996 ICHALKARANJI

| अ.नं. | तपशिल | इतर माहीती |
|---|---|---|
| १ | पात्रता | १. बँकेच्या सध्याच्या कर्जदारां करीता ही योजना लागु राहील.<br>२. व्यक्तीगत/समुह अधिकतम कर्ज मर्यादा निकष लागु राहतील.<br>३. अशा कर्जदाराचे आपल्या बँकेकडील कर्ज खाते नियमित असावे<br>४. जुन्या चालू कर्ज खातेसाठी रजिस्टर मार्गेज दस्त केलेला असणे व प्रॉपर्टीकार्ड/७/१२ उता-यावर आपल्या बँकेचा कर्ज बोजा नोंद असणे आवश्यक.<br>५. मुळ मंजूरी पत्रातील महत्वाच्या अटीची पुर्तता केली असणे आवश्यक.<br>६. वाढीव कर्जाच्या हप्त्याची परतफेड करणेची क्षमता असणे सारखा व्यवसाय असणे आवश्यक.<br>७. संबंधित व्यवसायाचे जीएसटी नंबर व जीएसटी रिटर्न असावे.<br>८. सन २०१८-१९ व २०१९-२० या वर्षातील आर्थिक पत्रके व आयटीआर किंवा सन २०१९-२० सालातील ताळेबंद पत्रक घेणे आवश्यक तसेच सदर व्यवसाय नफ्यात असणे आवश्यक. |
| २ | कर्जाचे धोरण | या योजने अंतर्गत दिले जाणारे कर्ज फक्त व्यापार/व्यवसाय / उत्पादन इ. कारणा करीता दिले जाईल. |
| ३ | कर्जाची रक्कम व तारण | व्यवसायाचे स्वरूप,कर्जाची गरज विचारात घेऊन तसचे जुने कर्जाची रक्कम व कर्जाचे तारण याचा विचार करून खालील सर्व साधारणपणे मर्यादेपर्यंत कर्ज मंजुरी करणेत येईल.<br>१. सध्याचे जुने कर्ज मंजूरी- सी.सी व टर्म लोन एकूण कर्ज रक्कमेच्या २०% जादा वाढीव टर्म लोन देता येईल.<br>२. या वाढीव कर्जासाठी रजिस्टर वकील नोटरी दस्त नोंदविणे आवश्यक राहील. |
| ४ | कर्जाचा व्याजदर | संचालक मंडळाने ठरविलेल्या धोरणा प्रमाणे व्याज दर-१०.७५% |
| ५ | व्याज आकारणी | दरमहा |
| ६ | कर्जाचा हप्ता | १.सदर कर्जासाठी सुरूवातीचे १२ महिने मोरॅटोरिअम पिरीअड (हप्ता सवलत)राहील.<br>१. उर्वरीत ३६ महिने मासिक/ तिमाही हप्ता व व्याज अशी सर्व रक्कम परतफेड करणेचे आहे. |
| ७ | मुख्य तारण | जुने कर्जाचे सर्व तारण मालमत्ता इ. |
| ८ | विमा | जुने कर्जातील तारण स्टॉक,मशिनरी,फर्निचर,मिळकत इ.चा विमा अद्यावत असलेची खात्री करणे. मुदत संपली असलेस पुर्तता करणे. |
| ९ | कर्ज परतफेड मुदत | • सदर कर्जाकरीता कमाल परतफेड कालावधी ४८ महिने राहील. दरमहा इएमआयने /मासिक +व्याज/तिमाही+ व्याज पध्दतीने परतफेड करणेची आहे.<br>• कर्ज मुदत मर्यादा कमाल ४८ महिने पेक्षा जास्त कोणत्याही परिस्थितीत असणार नाही. |
| १० | शेअर लिंकिंग | बँकेच्या नियमानुसार मंजूर कर्जाच्या २.५% शेअर्स लिंकिंग करणे आवश्यक आहे. |
| ११ | प्रोसेसिंग चार्जेस | बँकेच्या नियमाप्रमाणे संचालक मंडळ मिटींगमध्ये ठरले प्रमाणे. |

SHRI ADINATHA CO-OP. BANK LTD. R.No. KPR/HLE/BNK (D) 113/96 Dt. 16.1.1996 ICHALKARANJI

| | | |
|---|---|---|
| | | • कर्ज रक्कमेच्या -१% |
| १२ | जामिनदार | १.सदर योजनेत जुन्या कर्जातील दोन जामिनदार घेणे.<br>२.काही अपरिहार्य कारणा कारीता नविन जामिनदार घेणेचे असलेस दोन सक्षम सभासद जामिनदार आवश्यक.<br>२.आवश्यकतेनुसार पती/घरातील जबाबदार व्यक्ती सहकर्जदार होणे आवश्यक. |
| १३ | कर्ज मंजूरी करीता आवश्यक कागदपत्रे व अटी | १.व्यवसायास आवश्यक असणा-या नोंदी व प्रमाणपत्रे घेणे.<br>२.व्यवसायाची आर्थिक पत्रके आवश्यकता असलेले रिपोर्ट घेणे.<br>३.व्यवसायाचे ठिकाणाबाबत कागदपत्र घेणे.<br>४.स्थावर मिळकतीचे पेपर्स-स्थावर मिळकतचे मालकी संदर्भातील ७/१२/प्रॉपर्टी कार्ड, इ.,घेणे.<br>५. अद्यावत सर्च रिपोर्ट व व्हॅल्यएशन रिपोर्ट इ.कागदपत्रे आवश्यक<br>६. केवायसी पुर्तता करणे आवश्यक, तसेच व्यक्तीगत सेव्हिंग्ज खाते आणि फर्मचे चालू खाते आवश्यक. |
| १४ | इतर महत्वाच्या अटी व शर्ती | १.कर्ज मुदतपुर्व परतफेड केलेस प्री- क्लोजर चार्जेस आकारले जाणार नाही.व मुदतपूर्व नियमित कर्ज रक्कम परत केलेस व्याजात रिबेट दिले जाणार नाही.<br>२.मुळ कर्ज व वाढीव कर्ज मर्यादा शासनाच्या एक रक्कमी कर्ज परतफेड योजना (OTS) साठी पात्र असणार नाही. तसेच कोणतेही शासकीय लाभ मिळणार नाही.<br>३.शासनाकडून व बँकेकडून कोणत्याही प्रकारची व्याज सवलत मिळणार नाही. |
| १५ | मुद्रांक शुल्क आकारणी बाबत | सदर योजनेतील कर्ज रक्कमे करीता खालील प्रमाणे मुद्रांक शुल्क आकारणेचे आहे. स्टॅम्प डयुटी-<br>१ लाख ते ५ लाखापर्यंत-0.१% स्टॅम्प डयुटी<br>५ लाखपुढील -0.२% स्टॅम्प डयुटी |
| १६ | कर्ज मंजूरीचे कागदपत्रे | प्रॉमिसरी नोट, जुने मार्गेज डीड झेरॉक्स , वकील नोटरी, जामिनकी कतबा, इ.बँकेच्या नियमा प्रमाणे सर्व कागदपत्रे योग्य त्या स्टॅम्पवर पूर्ण करणे आवश्यक. |
| १७ | कर्ज मंजूरीचे अधिकार | या योजने अंतर्गत कर्ज मंजूरीचे अधिकार व वेळोवेळी होणारे बदल या बाबतचे सर्वाधिकार बँकेच्या संचालक मंडळास राहील. |
| १८ | स्किम कोड व नांव | लिस्ट सॉप्टवेअर मध्ये या योजने करीता खालील स्किम कोड ४२१ राहील (कर्ज प्रकार नांव-कोविड -१९ रिलीफ लोन) |

तसेच इतर आपत्तकालीन परिस्थितीचा विचार करून त्याबाबत पुढील प्रमाणे ठरविणेत आले.

✓ **कर्जदार दर्जा** (Rating of the borrower)

व्यवसायात स्पर्धा वाढलेली आहे. स्पर्धेमध्ये समाजातील चांगले कर्जदार आपल्या बँकेकडे आकृष्ट होणे आवश्यक आहे.तसेच सध्या असलेले चांगले कर्जदार आपल्याच बँकेकडे राहतील याचाही विचार करणे आवश्यक आहे.कारण चांगले कर्जदार म्हणजे जे नियमित व्याज देतात व हप्त्यांची परतफेड

SHRI ADINATHA CO-OP BANK LTD. R.No. KPR/HLE/BNK (D) 113/96 Dt. 16.1.1996 ICHALKARANJI

नियमीत करतात अशा कर्जदारांमुळेच बँक सुस्थितीत राहते.अशा कर्जदारांना आकर्षित करणेसाठी कांही सोई सवलती विशेषत: कर्जाच्या व्याज दरांमध्ये देणेची पध्दत सुरु झाली आहे.नागरी सहकारी बँका ही यात मागे नाहीत. परिस्थिती नुसार आपल्या बँकेलाही हा विचार करून याबाबत धोरण खालीलप्रमाणे ठरविणेत येत आहे.यामुळे चांगल्या कर्जदारांना कमी व्याज दराची सवलत मिळून व्याजाच्या रक्कमा मोठ्या प्रमाणात वसुल होतील व इतरांना जास्त व्याज दराने आकारणी केलेले त्यातून ही धोका लक्षात येतो.उत्पन्न जास्त मिळेल अशी विचार धारणा यात आहे. याबाबत खालीलप्रमाणे धोरण आखणेत येत आहे.दरवर्षी वैधानिक लेखापरिक्षनानंतर मागील वर्षाच्या शेवटची स्थिती लक्षात घेऊन किमान कर्जावरील व्याजदर किती येतो हे काढावे,त्यालाच 'मिनीमम लेंडीग रेट' म्हटले जाते.मिनिमम लेंडीग रेट बरोबर व्यवस्थापन खर्च इत्यादीचा विचार करता,जादा येणाऱ्या व्याजदराला 'प्राईम लेंडीग रेट'म्हटले जाते. त्याचबरोबर कर्जदारांच्या दर्जानिहाय श्रेणी ठरवाव्यात.

**✓रेटींग ठरविणेसाठी विविध निकष व पध्दती-**

१.शिक्षण पात्रता-

२.बँकेशी असणारे नाते

३.कर्जदाराचे स्थलांतर

४.कर्जदाराचे /कुटुंबातील लोकांचे सध्याच्या उद्योगामधील अनुभव

५.सध्याची संधी भविष्यातील सदर उद्योगास असणा-या संधी

६.कर्जदाराचे उत्पन्नाचे दाखले पुरावा

७.कर्जदाराचे निव्वळ वार्षिक उत्पन्न

८.नेट वर्थ ते कर्ज रेशो

९.Fixed Obligation ते उत्पन्न रेशो

१०.दुय्यम / मुख्य तारणाचे प्रकार

११.किंमत/मुल्य याची अस्थिरता फक्त

१२.विक्री योग्यता (विना आर्थिक तारणाबाबत)

१३.दुय्यम तारणांने पुरविलेल संरक्षण

१४.कर्जदाराचे हप्ता कालावधी

१५.कर्जदार / जामिनदार हा दुस-या कोणास तरी जामिन असेल तर

१७.जामिनदाराचे नेटवर्थ ते कर्ज रेशो

१९.जामिनदार नं.२ ची मालमत्ता

२०. जामिनदाराचे नेटवर्थ ते कर्ज रेशो

दर्जानिहाय श्रेणी ठरविणेचे नियमावली स्वतंत्रपणे वरील प्रमाणे करण्यांत आली आहे व त्यात परिस्थितीनुसार बदल करण्यात येईल.दर्जा ठरविताना गुणपत्रिका १०० मार्क ची ठेवली जाईल.चांगल्या दर्जाच्या कर्ज खातेवर किमान व्याज दरापेक्षा अल्प जादा व्यादर लावावा व इतरांना किमान व्याज दरापेक्षा जास्त व्याज दर लावावा असे धोरण ठरविणेत येत आहे.वरीलप्रमाणे नियम करून दर्जाचे गुण ठरविणेत यावेत.

याबाबत गुणानुसार दर्जा खालिलप्रमाणे

| अ.नं. | वर्गीकरण | गुण | व्याजदर मर्यादा |
|---|---|---|---|
| 1 | A++ | 80+ | 10.25% |
| 2 | A+ | 70-80 | 10.75% |
| 3 | A | 60-70 | 11.25% |
| 4 | B | 50-60 | 11.75% |
| 5 | C | 40-50 | 12.25% |

### ✓ **Debt Equity Ratio ची व्याख्या**

सदरच्या प्रमाण (Ratio) करीता कर्जदाराची सर्व देणी (Total Liabilities) याला त्याचे भागभांडवल (Share Captial) ने भागून येणारा अंक हा त्याचा Debt Equity Ratio रेशो असेल.

$$\text{Debt Equity Ratio} = \frac{\text{सर्व देणी (Total Liabilities)}}{\text{भागभांडवल(Share Captial)}}$$

१ ते १.५ हा आदर्श रेशो(Ideal Ratio) असेल व हे प्रमाण चांगले आहे. तथापि सदरचे प्रमाण उद्योगानुसार बदलू शकते कारण काही उद्योग कर्जाच्या रक्कमेचा जास्त उपयोग करतात

### ✓ **वैधानिक देणी (Statutory Dues)-**

कर्जदारास कर्ज मंजूर झालेनंतर त्याचे कडून कोणतेही वैधानिक (Statutory Dues)- देणे रक्कम नाही व तो वैज्ञानिक देय बाबत कोठेही थकबाकीदार नाही म्हणुन त्याचेकडून तसे प्रतिज्ञापत्र (Affidavite)करून घेणे आवश्यक आहे.

### ✓ **मंजूर कर्ज रक्कमेचा विनियोग (End Use Of Funds)**

कर्जदाराने ज्या कारणाकरीता कर्ज मंजूर करून घेतले आहे त्याच कारणाकरीता सदर कर्ज रक्कमेचा विनियोग झाला आहे याची खात्री करणेकरीता बँकेकडून खालील गोष्टीची अंमलबजावणी करणेत येईल

१.कर्जदाराच्या नियतकालीक प्रगती अहवाल (Periodic Progress Report)/आर्थिक कागदपत्रांची (Financial Documents) ची अर्थपुर्ण छाननी करणे.

२.अर्थिक सहाय्य केलेल्या प्रत्येक युनिटला भेट देणे व बँकेस तारण / नजरगहाण (Hypothetication) दिलेल्या सिक्युरिटीजची पहाणी व तपासणी करणे.

३.कर्जदाराच्या खात्याच्या पुस्तकाची नियमित तपासणी करणे.

४.कर्जदाराकडून ज्या करणाकरीता कर्ज मंजूर झाले आहे त्याच कारणासाठी त्याचा विनियोग (Utilisation) केले आहे म्हणुन लेखी प्रमाणपत्र घेणे आणि यदाकदाचित सदर प्रमाणपत्र चुकीचे ठरलेस त्याच्यावर त्वरीत कारवाई करून त्यास अदा केलेल्या सर्व सोयी रद्द केल्या जातील.

५.शाखाच्या अंतर्गत लेखापरीक्षण आणि नियमित आढावा घेतेवेळी कर्ज एकरक्कमीच्या फेरबद्दल करण्याच्या सर्व बाबींची तपासणी करणे.

तसेच या व्यतिरिक्त पुनर्रचना करताना खालील मार्गदर्शक तत्वे ही लक्षात घेणेची काळजी घेतली जावी. या व्यतिरिक्त खालील प्रकारच्या कर्जाच्या पुनर्रचनेकरीता लागू नसतील .

तसेच अशा कर्जांना संजिवनी देत असताना ती विंडो ड्रेसिंग किंवा एव्हर ग्रीन किंवा नवीन जुने अशा पध्दतीच्या संकल्पना धरली जाऊ नये. केवळ कर्जदाराचे नवीन व्यवसायासाठी त्याला वेळ मिळावा व तो पुन्हा उभा राहावा हाच हेतू डोळयासमोर ठेवून कर्जाची पुनर्रचना केली आहे असे मानले जाईल.परंतु त्याला पुर्वी मंजूर असणा-या रक्कमेपेक्षा जादा रक्कमेची पुनर्रचना मान्य केली जाणार नाही.

सर्व साधारणपणे वरील कर्ज धोरणाप्रमाणे बँकेचे व्यवहार केला जाईल.एखाद्या मुद्याबाबत वरील धोरणात उल्लेख किंवा स्पष्टता नसलेस त्याबाबत त्या त्या वेळी चर्चा करून निर्णय घेणेत येतील. धोरण म्हणजे नियम नव्हेत त्यामुळे अपवादात्मक स्थितीत या धोरणाशिवाय कर्ज व्यवहाराबाबत निर्णय घेणेचा अधिकार संचालक मंडळास राहील.

**बँकेकडील कॅश क्रेडीट कर्ज खात्यांकरीता कर्ज सुविधांचे पुनरावलोकन/नुतनीकरण बाबत (Policy of Review/Renewal of Credit Facilities) ठरविणे बाबत निर्णय घेणे.**

आपल्या बँकेकडील कॅश क्रेडीट कर्ज खात्यांचे सध्या १२ महिन्यांनी रिनिवल केले जाते. याबाबत कर्जदारांची वारंवार नविन कर्ज अदा केलेसारखे कागदपत्रीय पुर्तता करावी लागत आहे. यामुळे कर्जदाराची होणारी गैरसोयी पाहता त्यांचेकडून व वार्षिक सभेमध्ये सभासद श्री.संजय कांचनकोटी,सतिश मगदूम व प्रकाश चौगुले यांचे कडून गैरसोय टाळणेसाठी उपाययोजना व्हावी असा आग्रह होत होता. तसेच मार्केटमधील स्पर्धात्मक परिस्थिती, बाहेरील बॅकांच्या कामकाजाची पध्दती, कर्जदाराची गैरसोय, शाखास्तरावरील व मुख्यालयाकडील वाढते काम याचा विचार करता सदर कर्ज खात्यांकरीता कर्ज सुविधांचे पुनरावलोकन/नुतनीकरण धोरण ठरविणे आवश्यक झाले आहे.

म्हणुन याबाबत कर्ज मुदत ३६ महिने व दर १२ महिन्यांनी आवश्यक कागदपत्रीय पुर्तता करून पुनरावलोकन-**Review** असे धोरण केलेले असून त्याचा विचार व सविस्तर चर्चा करून सदर धोरणाचे सविस्तर वाचन होऊन मंजूरी देणेत आली

| REVIEW / RENEWAL OF CASH CREDIT | |
|---|---|
| **कर्जाचा प्रकार** | - **HYPOTHICATION CASH CREDIT (HYP कॅश क्रेडीट ) व SECURED CASH CREDIT (SECURED कॅश क्रेडीट )** |
| **उद्देश** | - व्यवसायातील खेळते भांडवालाकरीता |
| **कर्जाची मुदत** | - सदर कर्ज खाते किमान 12 महिन्यांनी **REVIEW** किंवा **RENEW** करणे आवश्यक<br>- पहिल्या 2 वेळा सदर कर्ज खाते **REVIEW** करुन घेणे व तिस-या वेळी खाते **RENEW** करणेचे आहे.<br>- **1 st REVIEW** - कर्ज खाते उघडल्यापासुन किंवा **RENEW** केल्यापासुन 12 महिन्यांनी करावे.<br>- **2 nd REVIEW** - 1st REVIEW केल्यापासुन 12 महिन्यांनी करावे.<br>**- RENEWAL** - 2nd REVIEW केल्यापासुन 12 महिन्यांनी करावे. |
| **व्याजदर** | - रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे संचालक मंडळाने वेळोवेळी ठरविलेले व्याज दर<br>- कर्जदाराचे व्यवहार, कागदपत्रे, त्याची व्यवसायातील पत, उद्देश इ. चा विचार करुन RATING सुविधेनुसार व्याज दरामध्ये सवलतीने व्याज दर देणेत येईल. त्याची स्वतंत्र POLICY असेल. |
| **व्याजाची आकारणी** | - कर्जाची व्याज आकारणी मासिक राहील.<br>- अनियमीत कर्ज खात्यांकरीता 2% जादा व्याज आकारणी करणेत येईल<br>- कर्ज खात्यावर भरणा केले जाणारे रकमेतुन ज्या तारखेस रक्कम भरली जाईल त्या तारखे अखेरचे संपुर्ण कर्जावरील व्याजाची आकारणी करुन प्रथम संपुर्ण व्याज वसुल केले जाईल व उर्वरीत रक्कम मुदलात जमा करणेत येईल.<br>- RATING मध्ये सवलतीच्या व्याजदराने कर्ज खाते मंजुर झालेनंतर सदर कर्ज खाते थकीत अथवा N.P.A. झालेस सदर खातेस सवलत बंद होऊन REGULAR व्याज दर आकारणेत येईल |
| **<u>असेट वर्गीकरण</u>** | - रिझर्व बँकेच्या धोरण व निर्णयानुसार कर्जाचे वर्गीकरण स्टॅण्डर्ड व एन.पी.ए. मध्ये करणेत येईल.<br>- रिझर्व बँकेच्या निर्देशानुसार कर्जाचा हप्ता किंवा व्याज (जे आधी येईल त्यानुसार) देय झालेपासुन 90 दिवस थकबाकीत असलेस N.P.A. मार्किंग करणेचे आहे. |
| **नियमातील बदल** | कोणत्याही नियमातील बदल हा संचालक मंडळाच्या अधिकारात राहिल. |
| **आवश्यक कागदपत्रे** | - REVIEW किंवा RENEW Application Form<br>- मागील 2 वर्षांचे आर्थिक पत्रके तसेच ITR. आर्थिक पत्रके उपलब्ध नसतील तर अंदाजित आर्थिक पत्रके असणे आवश्यक.<br>- GST Returns ( लागु असतील तर)<br>- दरमहाचे स्टॉक स्टेटमेंट व व्यापारी येणी-देणी ( लागु असतील तर)<br>- जामीनदारांचे आर्थिक पत्रके तसेच ITR ( फक्त RENEW चे वेळी)<br>- शाखाधिकारी यांचा Visit Report<br>- Contunue Security Letter सदर REVIEW किंवा RENEW फॉर्म सोबत घेणे. त्याबरोबर योग्य STAMP Duty जोडणे. |
| **इतर अटी** | - REVIEW किंवा RENEW करताना आर्थिक पत्रके व आवश्यक कागदपत्रांची छाननी शाखाधिकारी यांनी स्वतः करणेचे आहे.<br>- तारण मिळकत, जामीनदार , कर्ज रक्कम इ. मध्ये बदल झालेस प्रधान कार्यालाकडुन मंजुरी घेणे आवश्यक.<br>- तारण मिळकत, जामीनदार , कर्ज रक्कम इ. मध्ये बदल झालेस त्या खातेस REVIEW करता येणार नाही.<br>- तारण मिळकत, जामीनदार , कर्ज रक्कम इ. मध्ये बदल झालेस त्यावेळेस सदर खाते RENEW करावे लागेल.<br>- कर्ज खातेस समाधानकारक व्यवहार, मासिक स्टॉक स्टेटमेंट वेळचेवेळी सादर होत असतील तरच कर्ज खाते REVIEW होईल.<br>- कर्ज खाते नियमित **(REGULAR)** असेल तरच REVIEW करता येईल.<br>- 1.00 कोटी वरील कर्ज खात्यांचे वर्षातुन किमान एकदा तरी STOCK AUDIT करणे आवश्यक आहे. |

मुख्य कार्यकारी अधिकारी